।।श्री शंकर।।

## ॥ श्री दासगणू महाराज विरचित श्रीगोदा-स्तोत्र ॥

।। श्लोक ।।

(शार्दूलविक्रीडित)

भो गोदे तव तो अगाध महिमा त्वन्नाम गोदावरी ।
स्वर्गारोहण ते जनास करण्या सोपान होसी खरी ।।
पापाब्धी जन ते असंख्य तरती स्नानें तुझ्या भूवरी ।
पावावें गणुतें झणीं शुभकरी चित्तीं न रोषा घरी ।।१।।

आलों धावत मी जसा कृपण तो द्रव्यार्थ ये धावुनी ।
मारी वत्स उड्या जसा जननि त्या धेनूप्रती पाहुनी ।।
वा मेघा अवलोकिता मयुर ते जैसे वनी नाचती ।
तैसा हा गणुदास पाहुन तुला आनंद मानी अती ।।२।।

नोहे हें तव तोय उद्दिथ दुजें जें वाहतें भूवरी ।
किंवा पीयुष मर्त्यलोक बघण्या आले असे सत्वरीं ।।
यासाठी त्यजुनी दिवा अमर ते कांठी तुझ्या नांदती ।
बोले त्याचमुळे गणू अखिल ती क्षेत्रेहि झाली रिती ।।३।।

त्या मी सोडुनियां तुला भजूं कुणा या मर्त्य-लोकांमध्ये ।
क्षेत्राची जननी म्हणून म्हणती वृद्धा तुला ते मुदे ।।
तूंते त्र्यंबक यामुळेच धरितो अत्यादराने शिरीं ।
वारावे गणुचे त्रिताप जननी ही एक याञ्चा खरी ।।४।।

(पृथ्वी)

असे बहुत पातकी परि पुनीत मातें करी ।
असे त्वदिय लेंकरुं मजविशीं न रोषा घरी ।।
पुनीत जन तारिल्या तव महत्त्व तें कायसें ।
अघाब्धि गणु तारिल्या खचित कीर्ति ती होतसे ।।५।।

(शार्दूलविक्रीडित)

वानूं काय तुझें तरी विभव मी हे माय गोदावरी ।
नृत्यातें करिती मयूर तुजला पाहून अत्यादरी ।
त्वत्तीरी तरुकोटरी स्थित अशा सा-या विहंगाप्रती ।
स्वर्गी वानिति देव अंतसमयी यानी तया वाहती ।।६।।

बंधूची चुकवावया भगिरथे शापोद्भवा दुर्गती ।
तूंते भूवरी आणिलें म्हणुनिया त्वन्नाम भागीरथी ।।
रेवा गौतमि तूंच साच वरदे देवी महामंगले ।
यासाठी म्हणतों गणू निजमुखें व्यासें तुला वर्णिलें ।।७।।

येता सोडुनि देवलोक पहिला मुक्काम जन्हूंदरी ।
केला त्वां म्हणुनी तुला वदति गे जन्हू कुमारी खरी ।।
वृद्धा होउनि पातलीस पुढती सह्याद्रि शैलावरी ।
भक्तांचे हरिसी त्रिताप म्हणुनी तुभ्यं नमो ईश्वरी ।।८।।

(शिखरिणी)

नमो देवी गंगे सकल सुरवंद्ये गुणखनी ।
महा पापघ्ना ती तुजसम न कोणी त्रिभुवनीं ।

जनांच्या उद्धारा वससि जननी या महिवरी ।
गणूदासाचें तें अशुभ अवघे गे दुर करी ।।९।।

(पृथ्वी)
नको मजसि मोकलूं मदिय हीच याच्ञा खरी ।
मुलास अवलोकितां जननि काय रोषा धरी ।।
कुपुत्र बहु जन्मती परि न गे कुमाता कुणी ।
गणू पतित आगळा परि कृपा करावी झणी ।।१०।।

(शार्दूलविक्रीडित)
झाला जो प्रभु मच्छ कच्छ भगवान् जो का रमेचा पती ।
तत्पादोद्भव तूं म्हणूनि तुजला विष्णूपदी बोलती ।।
प्रेमानें तुज वाहिलें प्रभुवरें श्रीशंकराने शिरीं ।
पावावें गणुतें झणी शुभकरी हे माय गोदावरी ।।११।।

त्यागोनी शिवतांडवा परिसुनी श्रीगौतमाच्या स्तवा ।
माना देउनि पातलीस वरदे तूं त्र्यंबकेशोद्भवा ।।
वृद्धा सर्व शुची मुनींद्र म्हणती उद्गीथ तूं भूवरी ।
पावावें गणुतें झणीं शुभकरी हे माय गोदावरी ।।१२।।

(अभंग)
माय माझी गोदावरी । राहे त्र्यंबकाच्या शिरीं ।
माझ्या गौतमीचे तीर । प्रति वैकुंठ साचार ।।
तिचे पाहतांच नीर । वेडा होतो शारंगधर ।
गणू म्हणे गोदाबाई । तुझे कांठी ठाव देई ।।१३।।

पापाची वासना । नुपजो गंगे माझ्या मना ।
हीच तुजला विनंति । आण माते निजचित्तीं ।
घडो विठ्ठलाची सेवा । हीच आस माझ्या जिवा ।
गणु म्हणे कीर्तनरंग- । होवो, भेटो पांडुरंग ।।१४।।

॥ गोदा माता की जय ॥

|| श्रीशंकर ||

## कविराजराज पण्डित श्रीजगन्नाथ विरचित "गंगालहरी" यावर प्रा.अनंत दामोदर आठवले तथा स्वामी वरदानंद भारती (पू.अप्पा) रचित श्रीगंगातीरविहारिणी टीका

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीनिवासा सर्वाधारा । सर्वाद्या श्यामसुंदरा । पांडुरंगा रुक्मिणीवरा । वंदितो भावे चरणासी ।।१।। गणनाथ किंवा सरस्वति । हिरण्यगर्भ वा पशुपति । चंद्रसूर्य वा बृहस्पति । ही तो सारी रूपे तुझीं ।।२।। जें जें कांही निर्माण होते । दिसते नांदते वा वाढते । आणि अंती लीन होते। ते सत्तेने सर्व तुझ्या ।। ३ ।। भक्तांचे करण्या रक्षण । अनंतरूपे नटसी जाण । केव्हांहि तूं दयाघन । उपेक्षा त्यांची करिशी ना ।।४।। श्री जगन्नाथ पंडित । गंगालहरी तद्विरचित । काव्य असे जे भूषण भूत । सर्व संस्कृत वाङ्मयासी ॥५।। त्याचा भावार्थ मराठीत । आणावा ओवी छंदात । मी मनीं धरिला हेत । तो तूं पुरवी दयाळा ।।६।। तुझी कृपा जाहल्यावरी । पांगळाहि चढतो गिरी । मुकाहि वदे वैखरी। पंडिता थक्क करणारी ।।७।। म्हणून हे रुक्मिणीरमणा। शरण आलो तुझ्या चरणा । कृपाप्रसाद दयाघना । शीघ्र करावा मजवरी ।।८।। ज्ञानेश्वर तुकाराम। रामदासादि मुक्तिधाम । संसार तप्तांचे विश्राम । संत भावे वंदितो ते ।।९।। साई सद्गुरु वामन । होवोत मशी प्रसन्न । नातवाचे हट्ट पूर्ण । करावे की महाराजा ।।१०।। श्रीसद्गुरूंच्या चरणासी । नमन माझे अष्टांगेसी । जगांत तुमचा एक मशी। विश्वास आहे निःसंशय ।।११।। दादा ! तुमच्या कृपाबळे । अशक्य तेहि शक्य झाले । हेहि कार्य हाती घरिले । त्याच कृपेच्या बळावरी ॥१२॥ तुमचा वत्सल वरदकर। आहे माझ्या मस्तकावर | त्या योगाने येतो धीर । अक्षरे ही जुळविण्याचा ।।१३।। मी जुळवितो अक्षरा । तुम्ही त्यात भाव भरा । म्हणजे मांडिला पसारा | सार्थकी लागेल साराहि ।।१४।। असो व्हावे सावधान | तुम्ही श्रोते हो सज्जन । परिसा देऊन अवधान | भाव गंगालहरीचा ।।१५।। जगन्नाथ पंडिताने । आपुल्या उद्धारा कारणें । जी का प्रेमादराने ।

प्रार्थना केली गंगेची ॥१६॥ समर्थ भाषा संस्कृत। पंडितापुढे जोडून हात । उभी होती सदोदित। भाव झेलाया अंतरीचे ॥१७॥ कल्पना रम्य नादमधुर । रचना कोमल सुंदर । साहित्याचे अलंकार । धारण केले ज्या काव्यें ॥१८॥ ती ही कविता मनोहर। गंगालहरी नामें थोर । जिच्या गायनानें उद्धार। जाहला जगन्नाथाचा ॥१९॥ प्रसन्न झाली भागीरथी । ताप नेला विलयाप्रती। पंडिताची विमलकीर्ति । ख्यात झाली लोकांमधे ॥२०॥ ऐसे काव्य अति रसाळ। शब्द साहित्याने उज्वल । ज्या मधील अर्थ सकळ । अनुवादने सोपे नसे ॥२१॥ तरी भिडेच्या पडून भरी । सज्ज जाहलो कसातरी । तुम्हांपुढे गंगालहरी । माझ्या शब्दे सांगावया ।।२२।। बदाम केशर मिश्रित । गाईच्या आटीव दुधाप्रत । साध्या पाणाच्या द्रोणांत। भरून देतो प्यावयासी ॥२३॥ तुम्ही उदार क्षमाशील । पात्रदोष न चित्ती घ्याल । याच विश्वासे केवळ। हा प्रयत्न करितो मी ॥२४॥ पंडिताची गंगालहरी । लाविली मी भावानुसारी । त्या योगे क्रमाभितरी । पालट झाला श्लोकांच्या ॥२५॥ क्रमपालट तेवढा केला । जो का इष्ट गमला मला । असो पंडितराज गंगेला । स्तविते झाले ऐशापरी ॥२६॥

## (१)

हे वत्सले गंगामाय । तुझे पावन असे तोय । त्याची महती कशी काय । गाऊं माझ्या शब्दानें ।।२७।। अनेक प्रकारची संपत्ति । धारण करिते जी का क्षिती । तिचेहि सौभाग्य निश्चिती । समृद्ध झालें ज्यारूपें ।।२८।। सहज लीलेनें विश्वासी । निर्माण करी जो व्योमकेशी । तोहि तुझिया जलासी। निज वैभव थोर मानी ।।२९।। सार सर्वस्व वेदांतले । तव जलरूपे प्रगटले । किंवा वाटे साकारले । पुण्य देवांच्या तपाचे ।।३०।। अमृताचा सहोदर । ऐसे अंबे तुझे नीर । ते गे करो परिहार । आमुच्या सा-या अशुभाचा ।।३१।।

## (२)

गंगे तव थोरवीमुळे । शिवें तुजशी शिरी धरिले । परि हे ना सहन झाले । कृत्य देवी पार्वतीसी ।।३२।। आपण खाली अंकावरी । ही मस्तकी नांदे खरी । या मत्सरे अंतरी । पेटली माता गणेशाची ।।३३।। उगवत्या सूर्यासमान । लाल होती तिचे नयन । आणि पाही संतापून । तुजकडे ती असूयेने ।। ३४।। गिरिजेचा बघुन संताप । तुझा होतसे थरकाप । म्हणून गंगे तुझे आप । ठायींच लागे उसळाया ।।३५।। शिव शिरी असता नांदत । तुझ्या विशाल प्रवाहांत । उंच उंच खळबळतात । लाटा तेणे वरच्यावरी।।३६।। ऐसे उसळते तरंग । शोभविती तुझे अंग । त्यांचा स्पर्श करो भंग । पापनिर्मित भीतीचा ।।३७।।

**(३)**

प्रेमभावानें श्रीमहेश । अर्धांगी करी पार्वतीस । त्या सन्मानाने विशेष। प्रसन्न झाली युवती ती ।।३८।। मग प्रणयभरे करून । शिवास देई आलिंगन । सुखास्वादा मधे पूर्ण । रंगून गेली हैमवती ।।३९ ।। तो अवसर पाहुनी । सहज आले तुझ्या मनीं । की बाहेरी जटेतुनीं । थोडे मोकळे हिंडावे ।।४०।। परी तया गडबडीत । बाहेर पडता अकस्मात । जल तव पडले भांगांत । पार्वतीच्या शिरावरी।।४१।। मृदुल आपुले केस ओले । तुझ्या जलामुळे झाले । हे न तिसी मानवले । सापत्न-भावे करूनी ।।४२।। रागे वटारून डोळे । तिने तुजसी पाहिले । आणि त्वेषे झिडकारिले । स्वहस्ताने तुझ्या जला ।।४३।। पार्वतीचे कोमल हात । तरी त्यांचा आघात । होता उठल्या असंख्यांत । लहरी गंगे तुझ्यावरी।।४४ ।। त्या तुझिया तरंगाचा । विजय सर्वदा असो साचा । तोच आमुच्या आनंदाचा । आधार आहे सर्वस्वी ।।४५।।

**(४)**

स्वर्ग मृत्यू पाताळादि । चौदा भुवने जयामधीं । समावली, तो अनादि । ब्रह्मांडाचा गोल सारा ।।४६।। अंबे तुझ्या प्रवाहांत । भोपळ्यासम तरंगत । तरंगाच्या उचंबळीत । सहज खाई हेलकावे ।।४७।। या योगाने भागीरथी । उद्धरण्याची तुझी शक्ति । असामान्य आहे किती । तर्कावया येतसे ते ।।४८।। ऐसा हा सामर्थ्यशाली । जलौघ तुझा; चंद्रमौली । निज जटाजूटी विशाली । धारण करी लीलेने ।।४९ ।। जटेच्या निबिड बंधनांत । घोटाळे जो तेवल्या तेथ । तो आमुचे ताप समस्त । करो नाहीसे मातुश्री ।।५०।।

**(५)**

प्रदोषकाली शंकर । तांडव करिती मनोहर । त्या योगाने जटाभार। डोले त्यांच्या मस्तकीचा।।५१।। शिवाच्या त्या नाचता जटा । तुझ्या जली उठती लाटा । उसळण्या ये वेग मोठा। जटा तटी आदळूनी।।५२।। ते लहरीचे उसळणे । भासते आपुल्या शोभेने। जणुं भुजांची विक्षेपणे। नृत्यसमयी होणारी ।।५३ ।। त्याचवेळी कपारीत। आदळूनी निर्मितात । लाटा ध्वनि खणखणीत । डमरू साथ करी जसे।।५४।। श्रवण सुभग तालावर। ध्वनीच्या त्या मनोहर। तांडव चाले निरंतर । स्वर्धुनी तुझे या लोकीं ।।५५।। ते आमुच्या त्रितापासी। गंगे नेवो विलयासी । हीच एक चरणापाशी । प्रार्थना असे दासाची ।।५६ ।।

**(६)**

हे गंगे भागीरथी । तुझा महिमा वर्णू किती । सहज जरी दृष्टी पुढती। एकदा आले रूप तुझें ।।५७।। तरी तेवढ्या पुण्याने । करंट्यांचे केविलवाणे। दैन्य सारे सहजपणे । नष्ट होऊन

जाते की ।।५८।। कुवासना ओतप्रोत । भरल्या ज्याच्या हृदयांत । त्या दुर्जनांचेहि समस्त । पातक जाई विलयाला।।५९।। तुझ्या प्रवाहाचे दर्शन । एकदाहि होता जाण । ऐसे अद्‌भुत महिमान। आहे देवी गंगे तुझे ।।६०।। पसरलेला अनिवार । अविद्येचा वृक्ष थोर | ज्याच्या जंजाळात घोर । जीव राहे गुंतोनि ।।६१।। त्या भववृक्षाचे छेदन | करावे कसे हे शिक्षण । देण्या कुशलते करून । ओघ तुझा होतो गुरु ।।६२।। माते तुझी ही जलधारा । पवित्र अद्‌भुत उदारा । वैभव संपत्ति अपारा । देवो आम्हां शरणागता ।।६३।।

**(७)**

गंगे तुझ्या पात्रावरी । वायू लीलेने क्रीडा करी । त्यायोगे असंख्य लहरी । जलावरी उसळताती ।। ६४।। त्या नाचत्या लाटामुळें । डोलू लागती रम्य कमळें । पराग केशर तयांतले । गळती तुझ्या जलामधे ।।६५।। आणि तेणे मनोहारी । रंग येतसे केशरी । त्यामध्ये छटा दुसरी । मिसळे पांढ-या वर्णाची ।।६६।। देवस्त्रियांनी वक्ष:स्थली । उटी चंदनी लाविली । ती जाते मिसळली । स्नानें करितां तुझ्यामधें ।।६७ ।। त्या चंदनी गंधामुळे । जल तुझे जे गढुळ झाले । ते कुजवून टाको जाळे । आमुच्या जन्ममृत्यूचे ।।६८।।

**(८)**

वायू मोठा दुराचारी । दृष्टी त्याची सुगंधावरी । सुवास फुलांचा सतत चोरी । गंगे एरवी दुर्लभ जो ।।६९।। आणि होऊन सुवासित । स्वैरपणे राही वहात । उन्मत्तपणे करी आघात । विरहे घायाळ जनावरी।।७०।। विचित्र आग विरहाची । शितोपचारी भडके साची । त्यात सुगंधी वायूची । झुळुक घातक फार होई ।।७१।। घडता सुगंधाचे सेवन । विरही जन टाकिती प्राण । ऐशा अनेक हत्या जाण । दुष्टपणे वायू करी ।।७२।। ऐसा हा पातकी वारा । जयी तुझ्या स्पर्शितो नीरा । त्या स्पर्शाने होत निचरा । त्याच्या सा-या पातकांचा ।।७३।। तरंग सहवासे करून । उलट होतो पावन । तुझ्या स्पर्शसामर्थे करून । पवित्र करी विश्वाहि ।। ७४।। माते केवढे आश्चर्य हे । केल्या कृत्याचा शीण नोहे । उलट वायूसी येत आहे । पवित्रतेचे सामर्थ्य ।।७५।।

**(९)**

माध्यान्हीचा सूर्य प्रखर । नष्ट करितसे अंधार । तैसाच आहे अधिकार । तुझ्या तीरीच्या मातीचा ।।७६।। अंधेरा पळवी तमारि । माती दुर्दैवा निवारी । लीलेनेहि कोणी जरी । कपाळावरी लाविली ती ।।७७।। लिखित विधीचे दुर्निवार । जे रेखिले भालावर । त्याचा

कोणीहि परिहार । करु न शके म्हणताती ।।७८।। त्या दुर्दैवा हरण्या प्रति। समर्थ असे तुझी माती। हे गोदे भागीरथी । शोक घालवो ती माझा ॥७९।।

**(१०)**

तुझ्या तीराचे महिमान । झाडानाहि उमगले पूर्ण । म्हणून ते हसती जाण । इतर वेड्या मानवाना ।।८०।। टाकून तुझे तीर पवित्र । जे रमताती इतरत्र । त्यांची येई कीव मात्र । गंगे तीरीच्या वृक्षांना ।।८१।। आम्ही वृक्ष असून जड। गंगातीर आम्हां गोड । मानवजात असून उघड । हे अन्यत्र रमती कसे? ॥८२॥ भागीरथी या उपहासे । वृक्ष लताना येई हासे । तेच जणूका होतसे । रूप उमलत्या पुष्पांचे ।।८३॥ हेच वृक्ष पावन करिती। रजोमलिन भुंग्याप्रति। आपण होऊन आकर्षिती । त्याना सुगंधे पुष्पांच्या।।८४।। ऐसे शाहणे परोपकारी। वृक्ष गंगे तुझ्या तिरी । त्यांचे सख्य सर्वतोपरी । लाभो आम्हा पामराना ।।८५।।

**(११)**

क्षुद्र पक्षी जो कावळा । तोहि तुझ्या तीराला । जलक्रीडा करिता भला । संतोषाने भरुन येई ।।८६।। त्या तृप्तीने समाधान। त्यास इतुके लाभे जाण । की इंद्राचे नंदनवन । आकर्षक वाटे न त्या ।।८७।। ऐसे तुझे पावन तीर । त्याच्या आश्रया आल्यावर । जन्ममरणाचे अपार । दुःख तेहि दूर होई ।।८८।। ऐसे तीर शोकापहारी । तुझे गंगे गोदावरी । आमुचे श्रम करण्या दुरी । उद्‌युक्त होवो वात्सल्ये ।।८९।।

**(१२)**

हरिणसम विशाल डोळे । प्रसन्न जणु कमल फुलले । त्यानी जरी न चाखिले । रूप तुझे भागीरथी ।।९०।। तरी त्याचे मूल्य पाही । उरत नसे कवडीहि । नयनांचे सार्थक होई । एक तुझ्या दर्शनाने ।।९१।। अलौकिक ज्याचे सौंदर्य । तो हा प्रवाह रमणीय । त्याचे न ज्याना माधुर्य । ते न डोळे; त्या खांचा ।।९२।। नाचत्या लहरींचा तव । मेघ-मंजुल कलरव । कानावरती अभिनव । पडला न ज्या मानवाच्या ।।९३।। धिःकार असो त्या कानासी। मी न कान मानी त्यासी । उंदराची बिळें तैसी । बुजविण्या ते योग्य होती ।।९४।।

**(१३)**

चतुर विवेकी सज्जन । ते तव जाणून महिमान । साम्राज्यहि झिडकारून । टाकिती तुच्छ तणापरी ।।९५।। आणि तुझ्या तीरावरी । येऊन राहती निर्धारी । वेत लव्हाळे जेथ भारी ।

डोलती माते शोभेने ।।९६।। अमृताहि फिके करी । ऐसे तुझे मधुर वारी । त्याचे सेवन अत्यादरी । करुनी तृप्त होताती ।।९७।। तुझ्या तीरी करणे वास । सेवणे तुझ्या जलास । यामुळे त्यांच्या आनंदास । पारावार उरतो ना ।।९८।। तेव्हा त्याना मोक्षाचेहि । महत्त्व गंगे उरत नाही । आनंद त्यांचा हासे पाही । निर्गुण सुखा मुक्तीचिया ॥९९॥

## (१४)

पर्वतावरून असंख्यात । नद्या उगम पावतात । परी त्यातील कोणाप्रत । भाग्य तुज-सम लाभे ना ।।१००।। त्रिपुरारी जो शंकर । त्या शंभूच्या मस्तकावर । सांगे कुणा आजवर । स्थान लाभे तुझ्यापरी ।।१०१।। कमलनाभ लक्ष्मीपति । त्याची चरणकमले निश्चिती । तूंच धुतली या जगती। निज निर्मल जले पहा ।।१०२।। म्हणून कल्पना रचणारा । असून कवीच्या अंतरा । कोण्या नदीशी तुझी जरा । तुलना माते करवेना ।।१०३।।

## (१५)

श्रीपतीचे पदनख । कमलाहून जे सुरेख । तेच झाले अलौकिक । उत्पत्तिस्थल देवी तुझे ।।१०४।। मदनाचा अहंकार । ज्याने जाळून टाकिला पार । त्या शंभूच्या जटा, घर । केले तुवा राहण्यासी ।।१०५।। असे माहेर सासर । तुझे अलौकिक साचार । त्यांतून जीवन व्यापार | स्वीकारिला श्रेष्ठ तुवा ।।१०६।। ज्याना आधार कोठेहि । जगामधे उरला नाहीं। तयांना तू गंगामाई । उद्धरुन नेशी सदा ।।१०७।। ऐशा स्थितीमध्ये जननी । तुझ्या उत्कर्षालागुनी । का न चढावी शिराणी । सदा वाढती जगामधे ।।१०८।।

## (१६)

देवी गंगे तुझे जल । स्वभावे शीतल निर्मल । ज्याच्या प्रभावे पृथ्वीतल । जयजयकारे कोंदलेसे ।।१०९।। तुझा जलमहिमा अपार । शब्द न तेथे पावती पार । सगर राजाचे कुमार । ज्याच्या योगे उद्धरले ।।११०।। कपिलाच्या शापातुनी । मुक्तता लाभे त्यालागुनी । दिव्य देहासी धरोनि । स्वर्गलोका पावले ते ।।१११।। तेणे अद्याप तुझी कीर्ति । सगरपुत्र ते गाताती । गाता आनंदे ठाकती । रोमांच त्यांच्या देहावरी ।।११२।।

## (१७)

जनांच्या हरण्या शोकास । सोडूनिया स्वर्गसुखास । उतरण्या पृथ्वीतलास । येऊ लागता माते तुला ।।११३ ।। जटाजूटाच्या बंधनात । कोंडूनि ठेवी गिरिजाकांत । त्या निर्लोभ्याच्याहि

मनांत । गंगे उपजें लोभ तुझा ।।११४।। आसक्त करी विरक्ताहि । ऐसे सद्‌गुण तुझ्याठायी । त्याचा परिणाम मात्र होई । बंधनरूप दोषामधे ।।११५।।

**(१८)**

नृपस्त्रियांनी वक्षःस्थळी । विलासा उटी लाविली । होती कस्तुरीची भली । तीच स्नान करतांना ।।११६।। मिसळली तुझ्या जलात । तेणे घडले अद्‌भुत। दिव्यदेह झाले प्राप्त । तया कस्तुरी मृगानाहि ।।११७।। तेव्हा हजारो देवानी । विमानात बसवूनि। सन्मानाने स्वर्ग भुवनी । नेले तया हरिणांना ।।११८।। स्वर्गीच्या नंदनवनात। जे मुक्तपणाने हिंडतात । अप्रत्यक्षपणेहि होत । किती लाभ मृगाना हा !।।११९।।

**(१९)**

मग साक्षात् भागीरथी । तुझा स्पर्श घडल्यावरती । काय वानू उद्धरताती । घोर महापातकीहि ।। १२० ।। जे विप्रा ठार मारिती । निःशंकपणे दारु पिती । निर्लज्जपणे करिताती । गुरुपत्नीसी व्यभिचार ।। १२१।। चोरी करिता सोन्याची । ऐशी महापातकांची । आवर्तने करिता साची सातत्याने जीवनांत ।।१२२।। असे पापराशी केवळ । परी येता अंतःकाल । योगायोगाने तुझे जल । पाहून देहा सोडिताती ।।१२३।। तरी पातकांतून सुटती । श्रेष्ठ लोका प्राप्त होती । ज्या लोकांची न होते प्राप्ति । महादानें महायज्ञें ।।१२४।। एवढेच ना देवगण । मनी आदर ठेवून । करिती त्याना वंदन । तुझी थोरवी गाऊं किती ।।१२५।।

**(२०)**

कामक्रोधादि विकार । चित्तीं भडकती अनिवार त्यांच्या ज्वालांनी शरीर । जळत राहते प्रत्यही ।।१२६।। दिव्य सरिते दाहकता । त्यांना न येई वर्णिता । असे कठिण असाध्यता । त्यांची सन्निपाताहुनी ॥१२७॥ हा विकार वणवा घोर । विझवोत तुझे तुषार । जे उसळती सभोंवार । झोतामुळे वायूच्या ॥१२८॥

**(२१)**

सातत्याने जन्मभरी । जे राहती सदाचारी । आणि करिती परमादरी । सर्वदा जे पुण्यकृत्य ।।१२९।। त्या सज्जनांचे कल्याण । करिती दक्ष राहून । ऐसा कुशल देवगण । आहे मोठा कितीतरी ।।१३०।। परी ज्यानी एकदाहि । जन्मांत पुण्य जोडिले नाहीं। म्हणून भला

कोणताहि । जवळ ज्याना करितो ना ।।१३१।। त्याहि अनाथ पातक्यांना । मिळवोन देई कल्याणा । असा गंगे तुझ्याविना । अन्य कोणी आढळेना ।।१३२।।

## (२२)

क्षुद्र दोष येता घडून । पश्चाताप पावे मन । अशांचे करण्या तारण। विपुल तीर्थे विश्वांत या ।।१३३।। परी ज्यांचे जीवन । पातकानीच भरले पूर्ण । ज्यांच्यापुढे कुंठित जाण । गती प्रायश्चित्ताची ।।१३४।। ऐशी पातकें घडल्यानाहि । गंगे तू धरिशी हृदयी । तुझ्यासारखी तूच आई । विजयी एक पृथ्वीवरी ।।१३५।।

## (२३)

आपुले कशात आहे हित । हे न ज्याना उमगोनि येत । ऐशा मंदबुद्धीचे समस्त। मूर्ख असती जे कोणी ।।१३६।। उन्नतीकडे नेणारा । मार्ग सरळ साजिरा । तोहि न ज्या दिसे जरा । ऐसे आंधळे जे कोणी ।।१३७।। प्रगति विकास उन्नति । लाभते, त्या पथावरती । ज्या न चालवे तिळरती । असे पांगळे जे कोणी ।।१३८।। वरचेवरी हित वचन । सांगताहि आवर्जून । लव न घेती ऐकून । बहिरे असे जे कोणी ।।१३९।। बोल शिकवून चांगले। ज्यांनी न कधी उच्चारले । नाम न वाचे घेतले । ऐसे मुके जे कोणी ।।१४०।। कामक्रोधादि पिशाच्चानी । ज्याना टाकिले घेरोनि । विकाराच्या समंधानी । झपाटलेले जे कोणी ।।१४१।। उद्धाराचे मार्ग सारे । ज्याचे बंद झाले पुरे । देवानीहि ज्याना त्वरे । दूर लोटिले सर्वस्वी ।।१४२।। नरकी कोसळण्यावाचून। ज्यां न गति उरली आन । ज्यांचे सारे जीवन । पापपूर्ण निराधार ।।१४३।। त्या सर्वाहि रक्षिण्यासी । तूच दिव्य औषध होसी । तुझ्या अद्‌भुत वात्सल्यासी । माय गंगे गाऊ कसे ।।१४४।।

## (२४)

स्वार्थ आणि विषयासक्ति । यानी नुरले भानावरती। ते उन्मत्तहि निंदिताती । गंगे जया पातकांना ।।१४५।। सन्नीति, संस्कृति, सदाचार । यांचा सोडून आधार । पतित झाले जे नर । तेहि निंदिती जी पापें ।।१४६।। सर्व बंधने झुगारून । जे वागती स्वैर होऊन । ते व्रात्यहि उच्चारण । करण्या भिती ज्या पापा ।।१४७।। दुष्टांतील दुष्ट क्रूर । दगड दयाहीन निष्ठुर । भये त्यांच्याहि देहावर । काटा आणिती जी पापें ।।१४८।। अशी पातकें भयंकर । लोकी घडती वरचेवर । त्यांचाहि करिशी परिहार । न थकता न कंटाळता ।।१४९।। म्हणून सा-या जगत्रयीं । असशी तू एकटी विजयी । वंदन असो तुझ्या पायी । गंगे माझे साष्टांगी ।।१५०।।

**(२५)**

संसारभय महाघोर । मानवासी अति दुस्तर । तेहि क्षणांत होते दूर । पाहतांचि गंगे तुला ।।१५१।। अशी तुझी मंगलमूर्ति । कल्याणकारी निश्चिती । त्या तुझी गे थोरवी किती । वर्णू माझ्या मुखाने मी ।।१५२।। याच थोरवीसी मोहून । शिव शंभू मदनदहन । आपुल्या मस्तकीं धारण । सदैव करी तुजलागी ।।१५३ ।। हे कृत्य पार्वतीप्रत । सवतीमत्सरें न पसंत। तरीहि तिची समजूत । अनुनये न घाली शिव ।।१५४।।

**(२६)**

देवोनि नाना महादाना । साधूनि ध्यान धारणा । वा यज्ञादींच्या आचरणा । करुनी फार कष्टाने ।।१५५।। वा कठोर तपाचरणें । करितांहि पवित्रपणे । भारी दुर्घट लाभणे । पदकमलें श्रीविष्णूची ।॥१५६॥ जेथे वेद कुंठित झाले । ती श्रीहरिची पाऊले । मिळवून देशी कृपाळे । सर्वसामान्य जनासहि ।।१५७।।। भंडा-यातला प्रसाद । तसे विष्णूचे केले पद । तुळाया तुजसि प्रसिद्ध । आतां सांग कोण उरे ।।१५८।।

**(२७)**

विमानी बसून पुण्यवंते । सरळ जावे स्वर्गाते । अगतिकपणे पातक्यातें। पडावे लागे नरकामधें ।।१५९।। ऐशी विषम विभागणी । माते अशुभ देशांतुनी । जेथें पातक संहारिणी । मूर्ती तुझी नांदते ना ।।१६०।।

**(२८)**

जेव्हांपासून भूमीवरी । तुझी कीर्ति कल्याणकारी । पसरलीसे सर्वतोपरी । हे माते भागिरथी ।।१६१।। तेव्हापासून कोलाहल । दुःखितांचा नरकातील । मावळता झाला सकळ । ओस झाली यमपुरी ।।१६२।। दूर दूर यमाचे दूत । पृथ्वीवरी हिंडतात । पापी मृता शोधितात । ओढून न्याया निजलोकीं ।।१६३ ।। आणि इकडे स्वर्गीचा । गजबजला मार्ग साचा । तांडा दिव्य विमानांचा । लोका नेई उद्धरोनी ।।१६४।।

**(२९)**

गंगे आता चतुरानन । निवांतपणे लावून ध्यान । बसो एकांती जाऊन । काम नुरले कांही तया ।।१६५।। तैसेच भगवान शंकर । करोत तांडव निरंतर । शेषाच्या सुख शय्येवर । झोपोत सदा विष्णुहि ।।१६६।। पापा घालवी प्रायश्चित्त । तेहि होवो निवृत्त । आता तपे

आचरण्यात । महत्व काही उरले ना ।।१६७।। नको यज्ञ नको दान । त्यांचे न आता प्रयोजन । कारण तुझिया समान । आधार लाभे आम्हांसी ।।१६८।। सर्व इच्छा पुरविणारी । वत्सल माता तुझ्यापरी । जागत असता भूमीवरी । अन्य कोणी हवे कुणा ।।१६९।।

## (३०)

गंगे तुझी वत्सला मूर्ति । सर्व देवं भावे भजती । आठव तिचा झाला चित्तीं । जरी कोण्या मानवाच्या ।।१७०।। तरी त्याच्या अंतरीची। जडता नष्ट होते साची । जशी स्थिति अंधाराची । होते चंद्रप्रकाशाने।।१७१।। जरी अल्पहि पुण्यकृत्य । करे घडले नसे सत्य । तरी लाभ हा अद्‌भुत । होतो बळे स्मरणाच्या ।।१७२।। अशी तुझी दिव्य मूर्ति । नेवो त्वरे विलया प्रति । पाप माझे त्रिविध गति । तेवी संताप चित्ताचा ।।१७३।।

## (३१)

स्वरूप तुझें पावन । गंगे सद्धर्माची खाण । आनंद देई नूतन । नित्य, न येई वार्णाया ।।१७४।। जी करिती पापमोचन । त्या तीर्थी तू श्रेष्ठ जाण । निर्मळ असे पांघरुण । तूच होशी विश्वाचे ।।१७५।। बुद्धि असामान्य तीक्ष्ण । करी स्वास्थ्याचे विध्वंसन । तिचेहि होते समाधान । गंगे तुझ्या प्रभावाने ।।१७६।। दुर्मेधा जी कुलक्षण। तीहि होऊन जाते लीन। तुझ्या सामर्थेकरून । काय वानू महिमा हा ।।१७७।। ऐश्वर्य जे असाधारण । त्याचे तूंच आश्रयस्थान । आमुच्या त्रितापालागून । नेवो लया रूप तुझे ।।१७८।।

## (३२)

माते गंगे पृथ्वीवर । जलरूपाने साकार । होऊन वाहसी निरंतर परी मर्म वेगळेचि ।।१७९।। ज्या तत्त्वा वर्णण्याप्रति । होऊनियाहि एक मति । वेद म्हणती नेति नेति । ऐसे गहन गंभीर जे ।।१८०।। ज्याचे ज्ञान व्हावे म्हणून । जीव करिताती प्रयत्न । परी त्यांचेहि वाणी मन । कुंठीत होती ज्याचे पुढे ।।१८१।। ऐसे श्रेष्ठ सर्वतोपरी । तत्त्व निर्गुण निर्विकारी। ज्याच्या प्रभावे जाय दुरी । अंधार सारा द्वैतरुपी ।।१८२।। तत्त्व ते निर्मळ निरंजन । अक्षय नित्य नूतन । तेच तुझे स्वरूप जाण । तूं न विषय इंद्रियांचा।।१८३।। हे लक्षात घेउनी । जे लागती तुझ्या चरणी । त्यांनाच तूं गे तीर्थजननी । आपुले म्हणसी सर्वस्वी ।।१८४।।

## (३३)

गंगे तुझी पावन स्मृति । एकदां हि आल्या चित्तीं । सवेंच अंतःकरण वृत्ति । शांत होवोनि जातसे ।।१८५।। तुझ्या नामाचे गायन । येता एकदा मुखांतून । तेवढ्यानेहि निरसन ।

भवतापाचे होतसे ।।१८६।। ते गंगा नाव सुंदर । ऐकण्यासी मधुर फार । देवी माझ्या जिभेवर । नाचो अंतकालीहि ।।१८७।।

**(३४)**

स्वैर वर्तनी दुष्ट पतित । नाठाळ नास्तिक समस्त । त्याना तारण्याच्या व्यापात । सदा गढली आहेस तूं ।।१८८।। पाप्यांचे करावे रक्षण। हेच तुला जडले व्यसन । कोणी काही सांगून । तो जिव्हाळा संपेल कां ।।१८९ ।। तसेच दुर्वर्तनावरी । गंगे माझे प्रेम भारी । कोणाच्या स्वभावाभीतरी । पालट करता येत नाहीं ॥१९०।।

**(३५)**

तूं येऊन पृथ्वीतली । युगानुयुगे लोटली । परी न अद्यापी भेटली । पूर्ण पातकी व्यक्ति तुला ।।१९१।। की उद्‌घारितां जयाप्रत । लोक वहावे आश्चर्यचकित । तुझ्या सामर्थ्याचा चित्तांत । पुरा प्रत्यय त्यांस यावा ।।१९२।। ते घडो ही इच्छा सुप्त । होती तुझ्या अंतरात । ती पुरविण्या धरून हेत । हा मी आलो तुझ्याकडे ।।१९३।। दीर्घकालाचे मनोरथ ।पुरवून घेई गे त्वरित । गंगे मजसम जगांत । अन्य पापी भेटेल ना ।।१९४।।

**(३६)**

मी असा पातकी घोर । की करण्या माझा उद्धार । एकाहि तीर्था नुरे धीर । लाजून खाली बघती ती ।।१९५।। मम प्रश्न येता समोरी । श्रेष्ठ देव शंकरापरी । हात ठेविती कानावरी । साधे न म्हणती आम्हा हे ।।१९६।। त्याहि मजसम पातक्यासीं । तूं उद्धरण्या सज्ज होसी । कणव तुझ्या अंतरासी । व्यापून जणूं ओसंडते ।।१९७।। आम्ही आहो पतित- पावन । हा इतरांचा अभिमान । मजलागी उद्धरुन । सहज ठेचूं शकसी तूं ।।१९८।।

**(३७)**

संपत्तीच्या मद्यामुळे । ज्यांचे धुंद झाले डोळे । त्यांच्या पुढे पुढें केले । स्वार्थासाठी सर्वदा मी ।। १९९।। ऐशा या राजसेवेचे | फळ एकचि लाभले साचे । नित्य नूतन खिन्नतेचे । धनी व्हावे लागले मज ।।२००।। यात तुझा दोष नाहीं । चुक माझीच झाली पाही । सोडून तुला वत्सल आई। व्यर्थ हिंडलो वेड्यापरी ।।२०१।। माझे हित आहे कशांत । हे न घेतले लक्षांत। तुझी सेवा यत्किंचित | करें घडली नाही कधी ।।२०२।। या माझ्या अपराधासी । गंगे घालावे पोटासी । तू गे प्रत्यक्ष करुणाराशी। कृपा करावी एकवेळ ।।२०३।।

## (३८)

तुझ्यावीण कोणी दुसरे । मज ना जवळ करणारे । असेच गुण असती खरे । माझ्यापाशी भरलेले ।।२०४।। लाचारीने कुत्र्यापरी । वागलो धनिका समोरी । असत्य भाषण वरीवरी । कुटाळीने केले मी ।।२०५।। तर्क वाकडे सदा केले । पराचे अहित चिंतिले । त्यांच्या कृतीसी पाहिले । दुष्टाव्याने मत्सराने ।।२०६।। असे माझें असंख्य गुण। वरच्यावरी ऐकून । देवी गंगे तुझ्यावीण । तोंड माझे कोण पाही ।।२०७।।

## (३९)

पिओनि आईच्या स्तन्यातें । उनाडण्यासी पोर जाते । तैसेच वेडेचार माते । मीहि केले तुझ्यापुढे ।।२०८।। अमृतासम दिव्य वारी । तुझे प्राशिले वरीवरी । तरीहि झाली बुद्धि खरी । सोबत्यासह हिंडण्याची ।।२०९।। मित्र सारे उनाड चैनी । त्यासह फिरलो ठिकठिकाणी। परी कोठेहि मजलागुनी। विसावा तो लाभला ना ।।२१०।। शांत नीज न ये म्हणुनी। तळमळे मी पहा जननी । आतां घेई उचलुनी । गंगे आपुल्या अंकावरी।।२११।। थोपटुनी निजवी मला । सदय हृदय दीर्घ-काला । येथ साह्य होईल तुला । झुळूक शीतल वायूची ।।२१२।।

## (४०)

तुझा लाभता आधार । मज चढलासे गर्व फार । त्याने थोडासाहि विचार । माझे ठायी उरला ना ।।२१३।। जीवांच्या कल्याणाकरितां । ज्या ज्या असती देवता । त्याचे गंगे माझ्या चित्ता । महत्त्व मुळी वाटले ना ।।२१४।। त्या सर्व देवगणांची । मी अवज्ञा केली साची । जणु तुझ्या आधाराची । धुंदी चढली होती मला ।।२१५।। आतां त्यांच्यातील एकहि । देव लक्ष देणार नाहीं । माझ्याकडे आणि आई । तूंहि होशी उदासीन ।।२१६।। तरी मी झालो निराधार । मग गे कोणाच्या समोर । जाऊन रडावे सत्वर । सांग माते भागीरथी ।।२१७।।

## (४१)

मी अनाथ तू स्नेहमयी । मी अगतिक तू सन्मार्गदायी । मी घसरतो तूं तो पाही । उद्धारकर्ती विश्वाची ।।२१८।। मी नाना रोगाने पीडित । तूं दिव्य औषध मूर्तिमंत । मी तृषेने झालो व्यथित । तूं तो सागर अमृताचा ।।२१९।। आता किती आक्रोश करुं । तू गे माय मी लेकरु । झोंबुनी पदरा पाहे धरुं । करावे योग्य वाटेल ते ।।२२०।।

## (४२)

अनेक लोक तुझ्याकडे । धाव घेती ऐसे घडे । परी त्याचे एक उघडे । कारण आहे मातुःश्री ।।२२१।। मनी कामना धरून । सारे येती तुला शरण । तूहि करितेसी परिपूर्ण । गंगे यांचे मनोरथ ।।२२२।। मी मात्र त्यातला नाही । शपथ वाहून कथितो आई । माझें चित्त ओढ घेई । स्वभावाने तुझ्याकडे ।।२२३।। तुझिया प्रेमेंकरून । भरले माझें अंतःकरण। राहवते ना म्हणून । धाव घेतो तुझ्याकडे ।।२२४।।

## (४३)

इहलोकीच्या सुखासाठी । कित्येक करिती खटपटी । धरून जगाची राहाटी । आयुष्यासी वेचिताती ।।२२५।। पुण्य लोकाची व्हाया प्राप्ती । काही पवित्रपणे जगती । परलोकाचे त्यांचे चित्तीं । प्रेम गंगे राहतसे ।।२२६।। मी मात्र यातील काही । माते मुळींच करीत नाही । भार दोन्ही लोकांचाहि । सोपविलासे तुझ्यावरी ।।२२७।। तुझ्या कृपेच्या बळावर । काही न करता व्यापार । डोके तुझ्या मांडीवर । ठेवून झोपतो स्वस्थपणें ।।२२८।।

## (४४)

तिन्ही लोकासी पावन । करीत गंगे वाहसी जाण । तुझा भरवसा मनी पूर्ण । धरोनिया राहिलो मी ।।२२९।। कडक दैवता कोणी भजती । कल्याणाची व्हाया प्राप्ति । कठिन व्रतें आचरिती । कोणी यज्ञ यागादि ।।२३०।। कोणी करून फार श्रम । साधिताती यम नियम । ध्यान धारणा प्राणायाम । यांच्या नादी लागताती ।।२३१।। मी असल्या भानगडीत । पडत नाहीं यत्किंचित । घेत राहतो सदोदित । गंगा गंगा नाम मुखें ।।२३२।। तुझे नाव उच्चारितो । केवळ त्याने तृप्त होतो । त्याच्याबळे तुच्छ मानितो । गवतापरी जगतासी ।।२३३।।

## (४५)

मम कुशलाची चिंता सारी । सोपविली मी तुझ्यावरी । कधी न वाहिली अंतरी । काळजी योगक्षेमाची ।।२३४।। तुझा भरवसा चित्तांत। धरून राहतो सदा शांत । आतां ऐशा अवस्थेत । माझी उपेक्षा करू नको ।।२३५।। गंगे माते वत्सले । तूं जरी मजसी टाकिले । तरी विश्वासा नाही उरले । स्थान साऱ्या त्रिभुवनीहि ।।२३६।। विश्वासमात्र मावळेल । प्रेम निराधार होईल । निष्कपट जिव्हाळा पाहील । आश्रयासी कोणाकडे? ।।२३७।। म्हणून तसे ना करावे । विश्वासासी आधार हावे । वात्सल्ये हृदयीं घरावे । मज अनन्य लेकरासी ।।२३८।।

## (४६)

वेळ आतां न गंगे करी । सुसज्ज व्हावे झडकरी । कसून बांधावा कटीवरी । शेला सुंदर माते तुवा ।।२३९।। देवी तुझ्या मुगुटावर । जी खोचिली चंद्रकोर । ती निसटेल खरोखर । मज उचलून घेतांना ।।२४०।। यास्तव सर्व बंधनानी । नीट ती ठेव बांधुनी । येरवी परी पहा जननी । वेळ साधी सोपी न ही ।।२४१।। असंख्य पातकी भले भले । गंगे तुवा तारून नेले । विनायास सहज लीले । तसेच आतां मानू नको ।।२४२।। मी तसा सामान्य नाहीं । हे देवी लक्षात घेई । उद्धरण्याचा समय पाही । आहे जगन्नाथाच्या ।।२४३।।

## (४७)

दुष्ट धाडसी तस्कर । आपसांत करिती विचार । तरीही न होई निर्धार । जी पातके करण्याचा ।।२४४।। म्हणून त्यानीहि टाळावी । जे क्रूरा भये कापवी । अशा पातकांची समजावी । राशी प्रत्यक्ष मी आहे ।। त्याहि मज तारण्यासाठी । वात्सल्य धरून फार पोटी । गंगे तुवा कसिली कटी । थोरवी ही अलौकिक ।।२४६।। यथार्थपणे तुझी स्तुती । आतां कोण करूं शकती । आम्हां पामर नरा प्रति । कार्य हे का साधणारे ? ।।२४७।।

## (४८)

गंगे तुझी रम्य मूर्ति । स्वच्छ गोरी अंगकांती । जणू शोभे चंद्रिका ती । शरदऋतूच्या चंद्राची ।।२४८।। रत्नखचित मुगुटावर । चंद्राची शोभते कोर । तिच्या तेजाने अपार । शोभा प्राप्त झाली तया ।।२४९।। अमृताच्या कोमल धारा । घेती तंतूच्या आकारा । त्यानी विणलेल्या अंबरा । धारण करिशी माते तूं ।।२५०।। वरच्या दोन्ही हातात । कलश कमल विराजतात । खालचा उजवा वर देत । वाम कर अभयदायी ।।२५१।। शुभ्र सौम्य मगरावरी । आरुढ होशी नदीश्वरी । ऐसे तुझे मनोहारी । ध्यान चित्तीं साठवी जो ।।२५२।। त्याचा पराभव कधीहि । जगती या होणार नाही । ऐसे सामर्थ्य गंगामाई । आहे तुझ्या स्वरुपाचे ।।२५३।। ती तव रम्य उदार मूर्ति । परममंगला विमलकीर्ति । राहो सर्वदा माझे चित्तीं । हेचि प्रार्थना चरणासी ।।२५४।।

## (४९)

मागे एका अवतारी । शंतनूची होऊन नारी । वाढविलासी पृथ्वीवरी। वंश कौरव पांडवांचा ।।२५५।। आतां माझे कल्याण । साधावे त्वरा करुन । राहिलो मी भरवसून । सर्वस्वाने तुझ्यावरी ।।२५६।। गंगे तुझे वदन कमल । प्रसन्न हास्याने प्रफुल्ल । तेज जयाचे उज्वल | जणू अमृता वर्षितसे ।।२४७।। त्या अमृताच्या सिंचनें । संसार- तप्ताकारणें । आल्हाद लाभे

कोटी गुणे । दुःख सारे लया जाई ।।२५८।। परब्रह्मरूप चंद्राची । चंद्रिका तू प्रसन्न साची । चमत्कृति तव सामर्थ्याची । अघटित आहे मातुःश्री ।।२५९।। सर्वभावेंकरून । धरिले मी तुझे चरण । लेकराचे नेणपण । माता न आणी मनामधे ।।२६०।।

## (५०)

माझे श्रम निवारण्यासी । सामर्थ्य नाहीं कोणासी । माझ्या पुढती मौनासी । धरिले पहा मंत्रानी ।।२६१।। दिव्य औषधे निस्तेज झाली । देवांची गाळण उडाली । अमृताची चवी गेली । फुटून गेला चिंतामणी ।।२६२।। रत्ने झाली निस्तेज । प्रभाव त्यांचा संपे सहज । ऐशा स्थितीत आता मज । आधार दुसरा कोण गंगे ।।२६३।। तूंच देवी समर्थ एक । थोरवी तुझी अलौकिक । पुनीत केला स्वर्गलोक । तूच आपल्या तरंगानी ।।२६४।। कालियाच्या फणेवरी । पाऊलें जी नाचली खरी । त्या हरिपदा अत्यादरी । आपुल्या जले धुतले तूं ।।२६५।। संसार सर्प हा विखारी । मजलागी डंख मारी । त्याच्या विषाने अंतरी । आग माझ्या पेटली गे ।।२६६।। तिचे गंगे तुझ्यावीण । कोणी न करी निरसन । गंगामाय ये धावून । त्वरे शांतवी मजलागी ।।२६७।।

## (५१)

एकदां शंकर पार्वती । द्यूत खेळाया बसली होती । पणा लावीत पशुपति । उमा घेई जिंकोनि तो ।।२६८।। हस्तिचर्म पांघरण्याचे । प्रमथगण ते सेवेचे । हार तसेच रुद्राक्षाचे । नंदी चंद्रहि हरला शिव ।।२६९।। तेव्हा शिव हट्टा पेटला । कांही न उरले पणाला । मग त्याने स्वतःला । योजिले पणा लावण्याचे ।।२७०।। शिवाचा तो हरता पण । शंभूसी मी जिंकीन । त्याच्या सवे स्वाधीन । व्हावे लागेल गंगेसहि ।।२७१।। तयीं पाहू कशी शिरी । राहून मिरवी ऐट भारी । या अभिप्राये ती गौरी । हासून पाही तुझ्याकडे ।।२७२।। तेणे जननी आपोआप । तुझा उडाला थरकांप । आणि उसळू लागे आप । भविष्याच्या भयामुळे ।।२७३।। जल उसळता लाटा उठती । त्वेषें थैमान घालिती । त्याच धरिताती आकृति । तुझ्या दिव्य तांडवाची ।।२७४।। ते तुझें तांडव नृत्य । आम्हां पवित्र करो नित्य । तेणें होऊं कृतकृत्य । आम्ही गंगे जीवनी या ।।२७५।।

## (५२)

भगवान शिवाच्या मस्तकासी । तूंच गंगे भूषण होसी । अनेक जीवांच्या दुःखासी । नष्ट केले त्वरे तुवा ।।२७६।। उंच उंच मनोहर । तरंग तुझ्या जलावर । उसळताती निरंतर । चित्त ओढून घेती जे ।।२७७।। सर्व सुखासी सोडून । एकाग्र करून अंतःकरण । घेत बसावे

दर्शन । वाटे तुझ्या जलौघाचे ।।२७८।। गंगे तुझे धरिले चरण । विनविती हात जोडून । माझे शरीर आणि मन । पवित्र निर्मळ करी गे ।।२७९।।

**(५३)**

श्रीजगन्नाथाने विरचित | गंगालहरी या काव्यांत । भरले आहे अमृत । जे उसळते वरचेवरी ।।२८०।। त्याचे पठण चिंतन । करितां देऊन अवधान । त्यास सर्वत्र वरदान । लाभें सुखसंपदेचे ।।२८१।।

ऐसे जगन्नाथानें । स्तविले गंगेकारणे । त्याचा माझ्या शक्तीने । अनुवाद मी केला हा ।।२८२।। आनंदीदास लव्हेकर । देविदासाचा कुमार | आग्रह करी मजसी फार । अनुवाद हा सांगण्याचा ।।२८३।। गोदावरीचा जिव्हाळा । फार होता सद्गुरुला । म्हणून ऐशा आग्रहाला । नकार देणे साधले ना ।।२८४।। वेडीवाकडी कशीतरी । गाइली मी गंगालहरी । आनंद भोगिला अंतरी । गंगाकाठी राहिल्याचा ।।२८५।। देवी गंगेचे उपकार । बहुत असती माझेवर । परी बालकाने आभार । मानावें का मातेचे ? ।।२८६।। मातेचे वात्सल्य कोमल । शब्द-स्पर्श न त्या सोसेल । माझ्या मनीचे भाव सकळ । मौनानेहि कळती तिला ।।२८७।। आता फार बोलू किती । जेथें शब्दा नसे गति । शिर ठेविती पदावरती । गंगा गौतमी गोदेच्या ।।२८८।। गंगा गौतमी जान्हवीत । भेद मशी न किंचित । एकीने घेतले ओटीत । दुजी वागवी कडेवरी ।।२८९।। अनुवादाच्या निमित्ताने । बुद्धीस घडली दर्शनें । शुद्ध सात्त्विक आनंदाने । मना आली प्रसन्नता ।।२९०।। हाच लाभ सर्वांसहि । पठणे द्यावा गंगा माई । हीच आदरे तुझ्या पायी । **अनंता** ची याचना गे ।।२९१ ।। शके अठराशें चौऱ्याण्णवांत । परिधावी संवत्सरांत । जेष्ठाच्या शुद्ध पक्षात । भौमवारी नवमीसी ।।२९२।। गोदातटी नांदेडांत । राहून पुंडलिकवाडीत । बंधू प्रभाकराच्या घरांत । लेखन पुरते केले हे ।।२९३।। सद्गुरु माझे पुण्यराशी । म्हणवून घेती आपणासी । श्रीगोदातीर निवासी । तत्कृपे हे पूर्ण झाले ।।२९४।। अर्पिताती लोक सकळ । गंगेस गंगेचेच जल । तैसेच मी हे लडिवाळ । अर्पिती की सद्गुरुसी ।।२९५।। **गंगेच्या प्रसादे करून । विलया जावो सारे दैन्य । भारताचा स्वाभिमान । विजयी होवो सर्वलोकी ।।२९६।। म्हणा शुद्ध धरून हेतू । शांतिः पुष्टिः तुष्टिश्चास्तु । विश्वास धरितां तथास्तु । म्हणेल गंगामाय माझी ।।२९७।।**

**॥ गंगा-गोदा माता की जय ॥**

🌷🌷🌷🌷🌷🌷🌷🌷

ॐ श्री 卐 || श्रीशंकर || ॐ श्री 卐

## ॥ श्री भागीरथी स्तोत्र ॥

संतांचिया परम उंच मनस्थलीसी ।
घेऊन जन्म जनपावन भक्ति तैसी ॥
तू वाहतेस हिमपर्वत कन्यके गे ।
भागीरथी कर पवित्र मला निजांगे ॥१॥

सामर्थ्य जे असत वेदऋचांत सुप्त ।
जे प्रेम दिव्य परमेश-हृदांत गुप्त ॥
ते मूर्त होत तव रूप धरोनि वेगे ।
भागीरथी कर पवित्र मला निजांगे ॥२॥

संतप्त होत हर कालविषे तयासी ।
तू शांतवीसि सुख शीतल सीकरांसी ॥
तोषोनि तो शिरि धरी तुजला सवेगे ।
भागीरथी कर पवित्र मला निजांगे ॥३॥

गोदावरी कलिमलापहारी पवित्रा ।
तूंचि कलिंद गिरिजा व्रजरासपूत्रा ॥
भीमे शिवे अमरजे झणि पाव तुंगे ।
भागीरथी कर पवित्र मला निजांगे ॥४॥





श्रीशारदेसम तुझे जल शुभ्रवर्ण ।
लक्ष्मीपरी मधुर सौख्य समृध्दिपूर्ण ॥
हा ओघ उग्र जणू नाचत कालिका गे ।
भागीरथी कर पवित्र मला निजांगे ॥५॥

पाहून पुण्य तप यत्न अशा गुणासी ।
जे पावती बहुत देव असे महीसी ॥
तू माय वत्सल परी न तयातली गे ।
भागीरथी कर पवित्र मला निजांगे ॥६॥

स्पर्शेच केवळ निवारित तीन ताप ।
ऐसे प्रसिद्ध जननी तव एक आप ॥
त्याचीच साक्ष पटली मजसी इथे गे ।
भागीरथी कर पवित्र मला निजांगे ॥७॥

मी पाहिले तुजसि सद्गुरुंचे हृदात ।
तेथे कृपा-करूण वत्सल तू नितांत ॥
आता इथेहि वरदा जननी तशी गे ।
भागीरथी कर पवित्र मला निजांगे ॥८॥

(शके १९४१-४२) **स्वामी वरदानंद भारती जन्मशताब्दी वर्ष** (इ. स. २०१९-२०)

**॥ गंगा माता की जय ॥**

🌹🌷🌹🌷🌹🌷🌹🌷

ॐ श्री 卐 || श्रीशंकर || ॐ श्री 卐

# ॥ श्री गोदावरी प्रार्थना ॥

परम दयाघन दुसरी तुजविण नाही या भूवरी ग ।
उचलुनि घे मज पदरी अंबे गंगे गोदावरी ग ॥धृ.॥



|| श्री गोदामाता, गंगाद्वार, त्र्यंबकेश्वर ||


चढती रज तम, झिजती शम दम पाहुनी गौतममुनी ग ।
कळवळला मनि बसला जाउनी उग्र तपालागुनी ग ।
प्रसन्न करूनी गिरिजाशंकर आणी तुज महीवरी ग ।
उचलुनि घे मज पदरी अंबे गंगे गोदावरी ग ॥१॥

टाकुन पश्चिम सह्यागिरीहुन धावसी पूर्वेकडे ग ।
भिजवित राने फुलवित धान्ये, फोडित गिरिचे कडे ग ।
शमवित पापा, निववित तापा, सुखवित जन अंतरी ग ।
उचलुनि घे मज पदरी अंबे गंगे गोदावरी ग ॥२॥

शिणला शेषहि महिमा गाता वेदहि मौनावला ग ।
ब्रह्मपुराणीं व्यासे तो परि भावाने गाइला ग ।
देव साधुजन संत महात्मे रमती तुझिया तिरी ग ।
उचलुनि घे मज पदरी अंबे गंगे गोदावरी ग ॥३॥

प्रवाह अंबे प्रसन्न पावन, पवित्र डुलवित सुखे ग ।
निर्मळ जळ करि मंजुळ कलरव, जपत हरिसी मुखे ग ।
तरंग तव उत्तुंग अंग करि पुलकित मन केशरी ग ।
उचलुनि घे मज पदरी अंबे गंगे गोदावरी ग ॥४॥

स्नेहल जननी व्हावे तू झणि अनंत-वरदायिनी ग ।
कसे विसरशी सलील, सलिली तव, दिधले वाहुनी ग ।
वत्सलहृदये सद्गुरुराये मजसी रामेश्वरी ग ।
उचलुनि घे मज पदरी अंबे गंगे गोदावरी ग ॥५॥



## ।। गोदामाता की जय ।।

(शके १९४१-४२) स्वामी वरदानंद भारती जन्मशताब्दी वर्ष (इ. स. २०१९-२०)

## ॥ गोदा माता की जय ॥

🌹🌷🌹🌷🌹🌷🌹🌷